| Publication: Vishwadarpan | Pg No: 3 |
|---|---|
| Edition – Print | Date – 24.09.2021 |

**Four high-impact social entrepreneurs nominated as finalists of the ‘Social Entrepreneur of The Year’ Award - India 2021**

**By Schwab Foundation & Jubilant Bhartia Foundation**

# श्वाब फाउंडेशन आणि ज्युबिलंट भारत फाउंडेशनतर्फे देण्यात येणा–या 'सोशल आंत्रप्रेनर ऑफ दि इयर' – अवॉर्ड इंडिया २०२१

**नोएडा :** वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमची संस्था श्वाब फाउंडेशन फॉर सोशल आंत्रप्रेनरशिप आणि ज्युबिलंट भारती ग्रुपची ना–नफा तत्वावर चालणारी संस्था ज्युबिलंट भारतीय फाउंडेशन यांनी आज सोशल आंत्रप्रेनर ऑफ दि इयर (एसईओवाय) अवॉर्ड – इंडिया २०२१ साठीच्या अंतिम फेरीतील नामांकनांची यादी जाहीर केली.अपर्णा हेगडे, अरमान,सीमा प्रेम, फिया ग्लोबल,प्रांशु सिंघल, करो संभव, शुचिन बजाज, उजाला सिग्नस या यशस्वी प्रभावशाली सामाजिक उद्योजकांची एसईओवाय अवॉर्ड – इंडिया २०२१ च्या अंतिम फेरीसाठी निवड झाली आहे: विविध कार्यक्षेत्रांची पार्श्वभूमी लाभलेल्या दिग्गज आणि सन्माननीय व्यक्तिमत्त्वांचा समावेश असलेल्या परीक्षक मंडळाकडून पुरस्काराच्या अंतिम विजेत्याची निवड केली जाईल.'सोशल आंत्रप्रेनर ऑफ दि इयर' अवॉर्ड – भारत २०२१ या पुरस्काराचा मानकरी ठरणा–या सामाजिक उद्योजकाचे नाव गुरुवार, ७ ऑक्टोबर २०२१ रोजी होणा–या व्हर्च्युअल सोहळ्यामध्ये जाहीर केले जाईल. समाजकार्याच्या अपार उर्मीने काम करणा–या या व्यक्तिंच्या अनुकरणीय योगदानाचे कौतुक करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या व्हर्च्युअल पुरस्कार सोहळ्यामध्ये जगभरातील अनेक प्रतिष्ठीत व्यक्तींची उपस्थिती असणार आहे.अनेक आघाड्यांवर सामोरी येणारी आव्हाने पार करत सामाजिक यंत्रणेत बदल घडवून आणणा–या कार्यपद्धतींच्या बळावर सर्वसमावेशक विकास साध्य करण्याच्या प्रवासात कळीची भूमिका निभावत असलेल्या आश्वासक आणि यशस्वी सामाजिक उद्योजकांच्या कामाची दखल घेणे हे एसईओवाय पुरस्कारांचे लक्ष्य आहे. एसईओवाय अवॉर्ड – भारत २०२१ च्या अंतिम फेरीत पोहोचलेले सामाजिक उद्योजक म्हणजे सामाजिक बदलांना चालना देणा–या अत्यंत तडफदार व्यक्ती आहेत. वेगवेगळ्या मापदंडांच्या आधारे मूल्यमापनाचे काटेकोर निकष लावून त्यांची निवड करण्यात आली आहे. या निकषांमधये कोव्हिड–१९ मुळे उद्भवलेल्या परिस्थितीला दिलेला प्रतिसाद व त्यासंदर्भातील प्रयत्न, आपण निवडलेल्या सामाजिक समस्येच्या पार्श्वभूमीचा केलेला अभ्यास, वैयक्तिक पातळीवर आणि प्रत्यक्ष कामाच्या पातळीवर संस्थेच्या टीमकडून साधला जाणारा सुसंवाद, प्रभावशीलतेचे मूल्यमापन, तज्ज्ञांची मते आणि इतर संदर्भांच्या पडताळणीच्या आधारे ही निवड करण्यात आली आहे.अंतिम फेरीसाठी निवडले गेलेले साममाजिक उद्योजक हे तंत्रज्ञान–सिद्ध तज्ज्ञ असून ते प्रसूती व शिशुआरोग्य देखभाल, वंचित घटकांना सामावून घेणा–या आर्थिक सेवा, सर्क्युलर इकॉनॉमी ( ई–कचरा, प्लास्टिक, पॅकेजिंग, निकामी बॅट–या आणि काच यांच्या कच–यापासून पुनर्निर्मिती), तसेच समाजातील वंचित घटकांना उच्च दर्जाची तृतीय स्तरीय आरोग्यसेवा पुरविणे या क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत.आपापल्या उपक्रमांच्या आधारे जुन्या साच्यांना मोडणा–या नाविन्यपूर्ण संकल्पना मांडणारे हे सामाजिक उद्योजक तंत्रज्ञानाच्या कल्पक वापराद्वारे, एक्स्टेंडेट प्रोड्युसर रिस्पॉन्सिबिलिटी (ईपीआर) कार्यचौकटीवर काम करत, एआय तंत्रज्ञानाच्या बळावर फिन्टेक मंच विकसित करत, भारतातील द्वितीय आणि तृतीय श्रेणी शहरांमध्ये सुपर–स्पेशालिटी हॉस्पिटल्सची सेवा कमी खर्चात उपलब्ध करून देत प्रभावशाली कामगिरी करत आहेत.एसईओवाय अवॉर्ड – भारत २०२१ साठी मार्च २०२१ मध्ये अर्ज मागविण्यात आले व भारतातील २८ शहरांतील १०० वैविध्यपूर्ण अर्ज पुरस्कार समितीला प्राप्त झाले. या अर्जांमध्ये २८ महिला सामाजिक उद्योजकांचाही समावेश होता. सामाजिक हस्तक्षेपाच्या विविध गटांमध्ये आरोग्यसेवा, हरीत तंत्रज्ञान, जनसंपर्क, अपंगत्व, ऊर्जा, उद्योगविकास, श्रमिकांचे प्रश्न, मायक्रोफायनान्स, पोषण, शाश्वत शेती आणि पाणी व स्वच्छता या कार्यक्षेत्रांचा समावेश होता.